# प्रेसनोट

जा.क्र.पोउपआ/वाहतूक/पुणे शहर/ ११९२ /२०१८ पुणे, दिनांक- २७/१०/२०१८

**विषय :- वाहतुक शाखेकडून वाहतुक नियमन व नियमभंगाची कारवाई करताना बॉडी कॅमेराचा वापर करणार असले बाबत.**

---

पुणे शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत चालण्यासाठी पुणे शहर वाहतूक शाखा यांचेकडून नियमित प्रयत्न करण्यात येत असून, विशेष मोहिम राबवून वाहतूक नियमभंग करणा-या वाहन चालकांवर कारवाई करण्यात येते तसेच वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत वेळोवेळी प्रबोधन केले जाते.

वाहतुकीचे नियमभंग करणा-या वाहनचालकांवर वाहतुक पोलीस कारवाई करत असताना, काही वाहनचालक हे वाहतुक शाखेच्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेशी वाद-विवाद घालत असतात, धमक्या देत असतात त्यामुळे वाहतुक नियमन व कायदेशीर कारवाई करण्यामध्ये अडचणी येतात. वाहतुक शाखेतर्फे वाहतुक पोलीस कर्मचारी याना बॉडी कॅमेरे पुरविण्यात आले आहेत. सदर बॉडी कॅमेराचा वापर करुन सबंधीत नियमभंग करणा-या व वाद-विवाद करणा-याचे व्हिडीओ रेकार्डीग करण्यात येणार आहे. व त्यानंतर सबंधीत व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्यात येऊन त्यामध्ये सदरचे व्हिडीओ रेकॉर्डींग हे पुरावा म्हणून वापरण्यात येणार आहे.

तरी वाहनचालकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, वाहतूकीच्या नियमांचे तंतोतंत पालन करुन शहरातील वाहतुक सुरळीत करण्यात योगदान द्यावे.जर आपणाकडून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास वाहतुक पोलीस अधिकारी,कर्मचारी यांचेशी वाद विवाद घाऊ नये.


SHOT ON REDMI NOTE5 PRO
MI DUAL CAMERA